# We are Proud of our Alumni!!

# आम्हांला आमच्या विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान आहे.






**Captain Kaustubh Chatorikar, Completed Diploma in Mechnaical Engineering from Batch 2012-13 MET's Institute of Technology-Polytechnic, Nashik and** Currently working as a**Captain in Indian Army**

भारतीय सैन्य दलाच्या "टूर ऑफ आर्मी" या योजनेअंतर्गत, २० वर्षांखालील तरुणांना भारतीय लष्कर, नौदल व हवाई दलात जवान श्रेणीत, तीन वर्षांची सेवा करण्याची संधी मिळणार आहे. सैन्यदलाने तसा प्रस्ताव भारतीय सरकारकडे दिला असून, त्यावर लवकरच सकारात्मक निर्णय येण्याची शक्यता आहे. त्यामुळे, इस्त्राईल प्रमाणेच, भारतीय तरुणांना सक्तीचे नव्हे तर , आपल्या आवडी व इच्छेनुसार सैन्य दलातील शिस्त, अनुशासन व शौर्य अनुभवण्याची संधी मिळणार असल्याची बातमी , काही दिवसांपूर्वी वाचनात आली.

युद्ध व शांतता काळात, देशासाठी सीमारेषेवर व अंतर्गत आघाडीवर देखील निःस्वार्थ व अविरत सेवा देण्यात अग्रेसर असणारी एकमेव संस्था म्हणजे, भारतीय सैन्य दल (Indian Army). आपल्या सामरिक शक्ती व गुणवत्तेनुसार भारतीय सैन्य दल हे, जगातील दुसऱ्या क्रमांकाचे बलाढ्य सैन्य दल असून, त्यांत १,३६२,५०० सशस्त्र सैन्य दल आणि २,१००,००० राखीव सैन्य दलाचा समावेश आहे. भारत सरकारच्या, संरक्षण मंत्रालयांतर्गत भारतीय सशस्त्र सेनेत भुसेना (Indian Army), नौसेना (Indian Navy), हवाई दल Indian Airforce) यांचा समावेश होत असून, भारताचे राष्ट्रपती हे, तीनही सैन्यदलांचे पदसिद्ध सर्वोच्च प्रमुख असतात.

अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना Combined Defense Service Exam (CDSE) ह्या परीक्षेच्या माध्यमातून, केंद्रीय लोकसेवा आयोगा (UPSC) अंतर्गत, भारतीय सैन्य दलात प्रवेश मिळवता येतो. यासाठी अभियांत्रिकी पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले किंवा पदवीच्या शेवटच्या वर्षाला असणारे विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र असतात. Staff Selection Board (SSB) आणि वैद्यकीय चाचणीचा टप्पा पार केल्यानंतर, निवड झालेल्या उमेदवारांना, Indian Military Academy (IMA), देहरादून येथे, १८ महिन्यांच्या खडतर प्रशिक्षणासाठी (Commissioning) पाठविले जाते.

विद्यापीठ प्रवेश योजना (University Entry Scheme) या उपक्रमांतर्गत, अभियांत्रिकी पदवीच्या प्रीफायनल विद्यार्थ्यांना, भारतीय सैन्य दलात प्रवेश मिळण्याची एक उत्तम संधी दिली जाते. यातून निवड झालेल्या विद्यर्थ्यांना IMA , देहरादून येथे एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी पाठविले जाते. विद्यापीठ प्रवेश योजनेप्रमाणेच, Technical Graduate Course मार्फत देखील, अभियांत्रिकी पदवीच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना भारतीय सैन्य दलात प्रवेश मिळण्यासाठी अर्ज करता येतो. ह्या सर्व योजनांसाठी , Short Service Commission (SSC) अंतर्गत, पात्र उमेदवारांना वर्षातून एकदाच अर्ज करता येतो. निवड प्रक्रियेसाठी, उमेदवाराचे अभियांत्रिकी पदवी परीक्षेतील अंतिम वर्षाचे गुण ग्राह्य धरले जातात. ह्या परीक्षेसाठी पुरुष व महिला उमेदवारांसाठी वयोमर्यादा २० ते २७ वर्ष अशी असते. दरवर्षी, भारतीय सैन्य दलात काम करण्याचे स्वप्न बघत, लाखांहून अधिक उमेदवार अर्ज करतात, आणि त्यातील निवडक १०००

जणांना अत्यंत कठीण अशा निवड प्रक्रियेतून यशस्वी होत, Commissioned Rank वर काम करण्याचे भाग्य लाभते. **श्री. कौस्तुभ चाटोरीकर,** हा मेट पॉलीटेकनिकच्या, यंत्र अभियांत्रिकी विभागातील शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मधून उत्तीर्ण झालेला, असाच एक भाग्यवान विद्यार्थी. Combined Defense Service Exam (CDSE) देऊन, भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट म्हणून, २०१६ मध्ये निवड होऊन, सध्या तो हैदराबाद येथे कॅप्टन या पदावर कार्यरत आहे.

विश्लेषक वृत्ती, आत्मविश्वास, संभाषण कौशल्य आणि प्रभावी व्यक्तिमत्व या गुणांमुळे, डिप्लोमाला असल्यापासूनच कौस्तुभने विभागाच्या व संस्थेच्या विविध उपक्रमात सहभागी होत यश संपादन केले. कल्पकता व नाविन्यता यांचा प्रभावी वापर करत, वेगवेगळया राज्य व राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या टेकनिकल पेपर व प्रोजेक्ट प्रेसेंटेशन स्पर्धेत उत्स्फूर्ततेने सहभागी होत, आपल्या व्यक्तिमत्व विकासावर भर दिला. आपल्या अंगभूत गुण व क्षमता यावर असणाऱ्या आत्मविश्वासामुळे, त्याने विद्यार्थी दशेपासूनच स्वतःला Studentprenure (विद्यार्थी उद्योजक) प्रमाणे घडवत, विद्यार्थ्यांसाठी उद्योजगता, नाविन्यता व कल्पकता या विषयावर स्वानुभवातून कार्यशाळा घेतल्या.

कौस्तुभ हा राष्ट्रीय स्तरावर, उल्लेखनीय कामगिरी केलेला, उत्कृष्ठ जलतरणपटू असून, शालेय जीवनापासूनच जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील जलतरण स्पर्धेत, त्याने यश संपादन केले आहे. मेट पॉलीटेकनिक च्या मेकॅनिकल शाखेतून विशेष प्राविण्यासह डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर त्याने, पुण्याच्या सिम्बॉयसिस इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजि या संस्थेत अभियांत्रिकी (B.E. Mech. Engg.) पदवीसाठी प्रवेश घेतला. तिथेही त्याने,राज्य व राष्ट्रीय स्तरावरील आयोजित विविध उपक्रमांत सहभाग घेत तसेच, काही आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियतकालिकांत शोध निबंध प्रसिद्ध करत, आपली शैक्षणिक घोडदौड सुरु ठेवली.

भारतीय सैन्य दलाचे प्रमुख उद्दिष्ट हे, राष्ट्रीय सुरक्षा व एकता तसेच, बाह्य आक्रमणांपासून व अंतर्गत धोक्यांपासून वाचवणे,आणि सीमेवर शांतता व सुरक्षा टिकविणे हे असून, त्यासाठी भारतीय जवान पराक्रम, शौर्य आणि धैर्याने जीवाची बाजी लावत, आपल्याला सुरक्षित ठेवण्याचे कार्य अहोरात्र करत असतात.

कौस्तुभ प्रमाणेच, प्रसंगावधान, तर्क क्षमता, आत्मविश्वास, संभाषण कौशल्य, निष्ठा, दृढ निश्चय, संघभावना, धैर्य व नेतृत्व क्षमता असणाऱ्या गुणी विद्यार्थ्यांना, भारतीय सैन्य दलातील, विविध विभागात व विविध पदांवर काम करण्याची संधी प्राप्त होऊ शकते. त्यासाठी त्यांनी, विद्यार्थी दशेतच, या पर्यायाचा विचार करत, त्या दिशेने मार्गक्रमण करणे आवश्यक आहे.

**"सेवा परमो धर्म"** (Service is our duty) या भारतीय सैन्याच्या उदात्त विचार ध्येयाप्रमाणेच, कौस्तुभ देखील आपल्या देशासाठी, कर्तव्य बजावत, आपल्या आई-वडिलांप्रमाणेच शिक्षकांची देखील, मान उंचावत आहे. कौस्तुभला त्याच्या भावी यशस्वी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा !! **जयहिंद !!**

**अमोल पुरुषोत्तम वडनेरे,**
विभागप्रमुख- यंत्र अभियांत्रिकी विभाग,
मेट पॉलीटेकनिक-भुजबळ नॉलेज सिटी, नाशिक.